
# कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंना २ वर्षांची शिक्षा, मंत्रीपद-आमदारकीही जाणार?

मुंबई । प्रतिनिधी

कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने मोठा दणका दिलाय. माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने २ वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. माणिकराव कोकाटे यांना २ वर्षांचा कारावास आणि ५० हजारांच्या दंडाची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे. १९९५ साली कागदपत्रांच्या फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप माणिकराव कोकाटे यांच्यावर केला होता. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी या प्रकरणी याचिका दाखल केली होती. आता नाशिक जिल्हा न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांना शिक्षा ठोठावली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, १९९५ ते १९९७ च्या दरम्यानचे हे प्रकरण आहे. माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांनी शासनाकडून ज्या सदनिका मिळतात, त्या सदनिका घेतल्या होत्या. त्यावेळेस त्यांनी सांगितलेलं होतं की आमचं उत्पन्न कमी आहे आणि आम्हाला दुसरं घर नाहीये, अशा स्वरूपाची माहिती



## माणिकराव कोकाटेंना दोन वर्षांची शिक्षा

१९९५ साली कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप आरोप माणिकराव कोकाटे यांच्यावर करण्यात आला होता. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी याबाबत याचिका दाखल केली होती. याबाबतचा गुन्हा नाशिकच्या सरकार वाडा पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आलेला होता. हे प्रकरण १९९७ पासून सुरु होतं आणि आज या प्रकरणाचा निकाल लागलेला आहे. यामध्ये एकूण चार आरोपींना दाखवण्यात आलेले होते. त्यामध्ये माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या बंधूसह इतर दोघांचा समावेश होता. मात्र इतर दोन जणांबाबत कोर्टाने कुठल्याही स्वरूपाच्या शिक्षेची तरतूद केलेली नाही. मात्र माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू या दोघांना दोन वर्षाची शिक्षा आणि ५० हजारांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ५ वे ■ अंक १ गुरुवार दि. २० फेब्रुवारी २०२५ ■ RNI MAHMAR/2021/81481 पाने-४ किंमत ३ रुपये

# बीडमध्ये ऐतिहासिक शिवजयंती



सायं. दैनिक प्रारंभ बीड
संपादक-जालिंदर धांडे

## सांस्कृतिक कार्यक्रम, साहसी खेळांची बीडकरांना मेजवानी

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या माध्यमातून, आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली डीजेमुक्त आणि वर्गणीमुक्त सांस्कृतिक शिवजयंती सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बीडकरांना विविध कला-क्रीडा सादरीकरणाच्या माध्यमातून अनोखी मेजवानी मिळाली. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहक्ष यांच्या आयोजनातून बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर बुधवारी (दि.१९) रोजी शिवजन्मोत्सव सोहळ्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी लाखो शिवप्रेमींनी या कार्यक्रमाचा मनमुक्त आनंद घेतला. आ.संदीप क्षीरसागरांनीही ढोल-ताशांच्या आणि शिवगीतांवर ठेका धरला होता. हे पाहून तरुणाई भारावली होती. या कार्यक्रमास बीड शहरासह ग्रामीण भागातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, लाखो शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते.

### संदीपभैय्यांना मानावेच लागेल- मनोज जरांगे पाटील

अशा प्रकारची शिवजयंती मी पहिल्यांदाच पाहतोय. अशा प्रकारचे कौतुकास्पद नियोजन आणि आयोजन आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. महिला भगिनींनाही शिवजयंती उत्सवात सहभागी होता येईल याची काळजी शिवजयंती उत्सव समितीकडून घेतली जाते. ही विशेष बाब आहे. यासाठी तर संदीपभैय्यांना मानावेच लागते. अशा शब्दांत संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आ.संदीप क्षीरसागर व शिवजयंती उत्सव समितीचे कौतुक केले.

### असे होते सांस्कृतिक कार्यक्रम

- ♦ करवीर नाद ढोल पथकाच्या तब्बल ४५० कलाकारांचे सादरीकरण
- ♦ तिबेटीयन मॉंक यांचे शाओलीन मार्शल आर्ट या चित्तथरारक साहसी खेळाच्या सादरीकरणाने प्रेक्षकांच्या काळजाचा ठोका चुकवला.
- ♦ पश्चिम बंगाल येथील 'रायबिशी आर्ट स्कूल' नावाच्या पथक ऍक्रोबाईक्स फाईट आणि वेगवेगळे चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर केली.
- ♦ ओडिशा राज्यातील 'दुलदुली बाजा' नावाचे आदिवासी वाद्य पथकाने आपली लोकनृत्य सादर केले.
- ♦ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या लाईट आणि लेजर शो-ने प्रेक्षकांचे लक्ष वेधले.



# गेवराईत शिवशाही महानाट्य पाहण्यास गर्दी उसळली

## आ. विजयसिंह पंडित यांच्या तगड्या नियोजनात शिवजन्मोत्सव सोहळा साजरा





प्रारंभ । वृत्तसेवा

गेवराई : गेवराई शहरात आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली शारदा प्रतिष्ठान आणि राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात सायंकाळी ऐतिहासिक शिवशाही महानाट्याचा पहिला शो दिमाखात सुरु झाला. यावेळी शहाजीराजे आणि शिवरायांचा इतिहास डोळ्यात साठविण्यासाठी गेवराई शहरासह विधानसभा मतदारसंघाती नागरिकांनी उत्स्फूर्त गर्दी केली होती. आ.विजयसिंह पंडित यांच्या तगड्या नियोजनात महानाट्याच्या शुभारंभासह शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.

### गेवराई शहरात शिवरायांचे स्मारक तसेच अश्वारूढ पुतळा उभारणार -आ. विजयसिंह पंडित

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, शिवरायांचे आठवावे रुप, आठवावा प्रताप यासाठी या महानाट्याचे आयोजन केले आहे. शिवरायांचा इतिहास पुढील पीढीला सांगण्यासाठी हा शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला जातो. येणाऱ्या काळात शिवरायांचे स्मारक आणि अश्वारुढ पुतळा गेवराई शहरात उभारला जाईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. शिवजन्मोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचा तीन प्रयोग शिवजन्मोत्सवानिमित्त विनामुल्य आयोजन करण्यात आले आहे. शुभारंभाचा पहिला प्रयोग सर्वांसाठी असुन गुरुवार दि. २० रोजीचा प्रयोग केवळ महिलांसाठी आणि शुक्रवार दि. २१ रोजीचा प्रयोग शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला असल्याचे सांगून सर्व शोचा आनंद सर्वांनी घ्यावा असे आवाहन विजयसिंह पंडित यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, माजी मंत्री शिवाजीराव (दादा ) पंडित, माजी आमदार विलासराव खरात, धाराशिव येथील एनईपी शुगरचे नानासाहेब पाटील, तहसिलदार संदिप खोमने, अभिनेते प्रकाश धोत्रे, महेश कोकाटे, डॉ. राजेश आहेर, रमेश रोकडे, दिग्दर्शक महेंद्र महाडिक यांच्यासह समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्ष संदिप मडके, युवानेते रणविर पंडित यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते व शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन, शस्त्रपुजन, मुख्य रंगमंच पुजन, अश्वपुजन आणि श्री गणेशाची आरती करुन महानाट्याच्या शुभारंभ शोला प्रारंभ झाला.

# खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी शिवसेना नेहमीच कटिबद्ध : सचिन मुळूक

## शिवजयंती निमित्त बीडमध्ये नाथ चषक प्रीमियर लीग चे शानदार उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी शिवसेना नेहमीच कटिबद्ध आहे. नाथ चषक बीड प्रीमियर लीग च्या माध्यमातून खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम शिवसेनेने केले आहे. यापुढेही दरवर्षी नाथ चषक बीड प्रीमियर लीग चे आयोजन करून खेळाडूंना वाव देण्याचे काम करण्यात येईल असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.

बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक ▶▶ पान २ वर...



# महादेव मुंडे प्रकरणाच्या तपासाला सुरुवात

## एसआयटीकडून परळीतील ५० जणांची झाडाझडती

परळी । प्रतिनिधी

परळीतील महादेव मुंडे यांची निर्घृणपणे शहरातील तहसील कार्यालयासमोरील मैदानावर हत्या करण्यात आली. खूनाला १५ महिने उलटले तरी आरोपी फरार आहे. हा खून कोणी केला आणि कशासाठी केला त्याचा तपास पोलिसांकडून होऊ शकला नव्हता. महादेव मुंडेंची ( ) पत्नी मुंडे कुटुंबीय पोलीस ठाण्यात खेटे मारत होते मात्र तपास होत नसल्याचा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला होता. मुंडे कुटुंबियांनी या प्रकरणात आक्रमक भूमिका घेतल्यानंतर आता या प्रकरणाच्या तपासाची चक्रे वेगाने फिरताना दिसत आहेत. एसआयटीकडून परळीतील ५० जणांची झाडाझडती करण्यात आल्याची बातमी समोर येत आहे. परळीतील महादेव मुंडे प्रकरणात जे पाच सदस्यीय विशेष पथक स्थापन करण्यात आले होते. या पथकाकडून या प्रकरणाचा तपास केला जात आहे. पोलीस उपाअधिक्षक अनिल चोरमले यांनी तपासाची सुत्रे हाती घेतली असून खून कोणी केला? कारण काय होते ?

# अंजली दमानिया यांचे पुन्हा अर्धवट ज्ञान आणि खोट्या आरोपांचे प्रदर्शन

मुंबई । प्रतिनिधी

अंजली दमानिया यांनी आज पुन्हा एकदा अर्धवट ज्ञानाच्या आधारे खोटे बोलून जीआर काढला वगैरे म्हणून जे आरोप केले आहेत ते संपूर्णपणे चुकीचे असून त्या आपल्या अर्धवट ज्ञानाच्या आधारे खोटे आरोप करत असल्याचा खुलासा धनंजय मुंडे यांनी केला आहे.





शासनाच्या कार्य नियमावलीनुसार ( रुल्स ऑफ बिजनेस ) जीआर अर्थात शासन निर्णय निर्गमित करण्यासाठीची एक पद्धत आहे, त्यासाठी प्रक्रिया आखून देण्यात आलेली आहे .

विभागातील कक्ष अधिकाऱ्याने त्या प्रकरणाची फाईल सादर केल्यानंतर ती उपसचिव, विभागाचे सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव यांचे मार्फत मंत्र्यांच्या समोर मान्यतेस्तव येत असते, मंत्र्यांची मान्यता होण्यापूर्वी व झाल्या नंतर सुद्धा अतिरिक्त मुख्य सचिव दर्जाचे आय ए एस अधिकारी स्वतः ती फाईल तपासतात आणि त्या नंतरच तो शासन निर्णय निर्गमित होत असतो. त्यामुळे खोटे बोलून जीआर काढला वगैरे असे म्हणणे म्हणजे निव्वळ हास्यास्पद, मीडिया

# पुन्हा चेंगराचेंगरी ; अनुभवातून कधी शिकणार

लोकांची स्मरणशक्ती अत्यल्प असते. तशीच ती अधिकृत सरकारी प्रशासनाचीही असते. नाही तर नवी दिल्लीतील स्थानकावर झालेल्या चेगराचेगरीच्या दुर्घटनेची पुनरावृत्ती टळली असती. शनिवारी रात्री अचानक फलाट बदलावे लागल्यामुळे स्थानकावर चेगराचेगरीची अशीच दुर्घटना घडली आणि १८ निरपराध लोकांना आपला जीव गमवावा लागला. प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे की, त्या दिवशी नियम भंग केले गेले. म्हणजे एका प्रवाशाचा पाय घसरला आणि तो फलाट क्रमांक १४ आणि १५ कडे जाताना तेथे असलेल्या प्रवाशांमध्ये अभूतपूर्व चेगराचेगरी झाली. यात १८ प्रवासी ठार झाले. ही चूक सर्वस्वी रेल्वेची आहे. रेल्वेने आपल्या चुकीचा इन्कार केला आहे. पण यातील खरे काय ते आता चौकशीतच स्पष्ट होणार आहे. गर्दीचे व्यवस्थापन हे अत्यंत संशोधनात्मक विज्ञान आहे. अर्थात भारताला त्यात अजूनही फार मोठा पल्ला गाठायचा आहे. इतिहास असे सांगतो की, १९८० आणि २०२२ या दरम्यान रेल्वेसंबंधित चेगराचेगरीच्या दुर्घटनांत जागतिक स्तरावर १३७०० लोक ठार झाले आहेत.

अनेक दुर्घटनांत एखादी व्यक्ती घसरून पडल्यामुळे चेगराचेगरीची घटना घडली आहे. कुतूब मिनार दुर्घटना हे त्याचे उदाहरण आहे. त्यात मिनारचे प्रवेशद्वार लोकांनी अडवल्यामुळे ४५ प्रेक्षक ठार झाले होते. त्याची पुनरावृत्ती कालच्या दुर्घटनेतही दिसली आहे. मुंबईच्या एलफिन्स्टन रोड स्टेशनमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेतही जमावाचा दबाव निर्माण झाला आणि त्यात २९ प्रवाशांचे बळी गेले होते. ही घटना घडली २०१७ मध्ये. याचा अर्थ असा की, एखाद्या व्यक्तीच्या पाय घसरण्यामुळेही दुर्घटना घडू शकतात. पण आपण यापासून काय बोध घेतला आहे तर त्याचे उत्तर नाही असे आहे. जमाव जर एकवटला तर त्याच्या दबावाखाली मोठी भिंतही दाबली जाते आणि मग त्याच्या खाली येऊन अनेक माणसे मरतात आणि जायबंदी होतात. पण यातून रेल्वे व्यवस्थापन किंवा कोणतेही गर्दीचे व्यवस्थापन करणाऱ्यांनी असा धडा घेतला पाहिजे की, व्यवस्थापन करण्यास अयोग्य अशा गोष्टी टाळल्या पाहिजेत. शनिवारी फलाट क्रमांक १४ आणि १५ दरम्यान जो अवकाश होता तो भयंकर गर्दीने व्यापलेला होता. त्याकडे दुर्लक्ष कोणतेही सरकार करू शकले नसते. यात रेल्वेची चूक अशी आहे की, इतक्या गर्दीच्या काळातही रेल्वे प्रशासनाने अनारक्षित तिकिटांची विक्री सुरूच ठेवली होती. त्यातून गर्दी जास्तच उसळली. त्याचा परिणाम चेंगराचेंगरी होऊन १८ प्रवाशांचे प्राण गेले. ही सर्वस्वी चूक रेल्वे प्रशासनाची आहे. हे मान्य करायला हवे. याच फलाटांवर प्रवासी स्वतंत्रता सेनानी एक्स्प्रेस आणि भुवनेश्वर राजधानी एक्स्प्रेसचे प्रवासीही वाट पाहत थांबले होते. याचा अर्थ एकच आहे तो म्हणजे रेल्वे प्रशासन प्रयागराजकडे जाणाऱ्या प्रवाशांचा लोंढा रोखण्यात अपयशी ठरले. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी त्वरित उपाय जाहीर केले पण ते विलंबाने करण्यात आले. पण त्याला सरकारचा किंवा मंत्र्यांचा नाईलाज होता.

२०१३ मध्ये कुंभमध्ये झालेल्या अशाच दुर्घटनेत ३७ जणांचे प्राण गेले होते. यातून रेल्वे किंवा प्रशासन इतिहासातून, चुकांपासून काहीही शिकले नाही ही एक बाब स्पष्ट होते. यात विरोधी पक्षांचा सरकारवर टीका करण्याचा गलिच्छ प्रयत्न दिसून आला आहे. पण त्यात काही अर्थ नाही. कारण रेल्वे प्रशासन या दुर्घटनेला सर्वस्वी जबाबदार आहे. २९ जानेवारीच्या महाकुंभमधील दुर्घटनेनंतर महाकुंभला येणाऱ्या यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र यंत्रणा राबवली जात होती आणि त्यात सरकारी प्रशासन संपूर्ण सहभागी झाले होते. त्यामुळे कालच्या चेंगराचेंगरीच्या घटनेवर सरकार अजिबात दोषी नाही असे म्हणावे लागेल. कारणे अशी दिली जातात की, ट्रेन सुटण्यास विलंब, तिकीट विक्रीत वाढ आणि ऐन शेवटच्या क्षणी मार्ग बदलण्याची घोषणा यामुळे चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली असे सांगण्यात येते. यात सरकारचा कुठेही दोष नाही. हा दोष सर्वस्वी रेल्वे प्रशासनाचा आहे. आता हा मेगा फेस्टिव्हल संपण्यास दहा दिवसांचा कालावधी उरला आहे. त्यात प्रचंड गर्दी होणार आणि प्रशासनाची कसोटी लागणार याचा अंदाज रेल्वे प्रशासनास येणे आवश्यक होते. पण प्रशासन आपल्याच धुंदीत राहिले आणि त्याचा फटका १८ निरपराध प्रवाशांना बसला. आता जे जीव गेले आहेत ते कोणतीही किंमत देऊन परत येणार नाहीत. जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या देशात गर्दी ही सामान्य गोष्ट आहे हे सर्वजण जाणतात.

गर्दीच्या हालचाली नियंत्रित करण्यासाठी सुरक्षा कर्मचाऱ्यांची तैनाती आणि व्यवस्थेचे काटेकोर नियोजन या मूलभूत बाबी आहेत. पण रेल्वे प्रशासनाला त्याचाच विसर पडला आहे की काय, अशी शंका येते. जेथे लोकांचा सहभाग प्रचंड असतो अशा वेळेस या तर किमान आवश्यक गोष्टी आहेत. पण रेल्वे नेमक्या त्याच बाबी विसरले आणि त्याचा फटका प्रवाशांना बसला असे म्हणावे लागेल. २०१४ मध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने राज्य सरकारे, स्थानिक अधिकारी, प्रशासक आणि आयोजकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली होती. पण ती तत्त्वे कागदावरच राहिली आहेत. त्यांचा वापर प्रत्यक्ष गर्दीच्या व्यवस्थापनाबाबत कधीही केला जात नाही हे दुर्दैवी वास्तव आहे. या सर्व भागधारकांनी या महत्त्वाच्या दस्तऐवजाकडे दुर्लक्ष केले तर मात्र अशा चेंगराचेंगरीच्या घटना भविष्यात घडत राहतील यात काही शंका नाही. त्यांची पुनरावृत्ती टाळणे हे सरकारचे नाही, तर प्रशासनाचे आणि आपले काम आहे. पण यातील एकाही घटकाने आपला रोल केला नाही, तर दुर्घटना सहज शक्य आहे. हेच या शनिवारच्या भीषण घटनेने दाखवून दिले आहे.

# जालिंदर धांडे : स्वाभिमानी, जिद्दी, मेहनती आणि अभ्यासू संपादक

पत्रकारिता म्हणजे केवळ बातम्या देण्याचे काम नाही, तर ती समाजाच्या मनोवृत्तीला आकार देण्याचे प्रभावी साधन आहे. पत्रकारिता प्रामाणिक, अभ्यासपूर्ण आणि निर्भीड असेल, तरच ती लोकशाहीसाठी खऱ्या अर्थाने महत्त्वाची ठरते. अशाच एका स्वाभिमानी, जिद्दी, मेहनती आणि अभ्यासू संपादकाचे नाव म्हणजे जालिंदर धांडे 'सायं दैनिक प्रारंभ'चे संपादक. त्यांची पत्रकारिता केवळ बातम्यांपुरती मर्यादित नाही; ती एक चळवळ आहे, समाजाला जागं करण्याचा ध्यास आहे. तसेच पत्रकारिता क्षेत्रांमध्ये नवीन पदार्पण करणाऱ्या नव पत्रकारांसाठी एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणजे संपादक जालिंदर धांडे सर हे होय.

सुरुवातीला दैनिक सूर्योदय व त्यानंतर दैनिक सकाळ या नामांकित दैनिकात पत्रकारिता केली. दैनिक सकाळमध्ये काही काळ ते माझे वरिष्ठ सहकारीही होते. पत्रकारिता क्षेत्रामुळे संपादक जालिंदर धांडे सर यांच्याशी माझे जवळचे संबंध आले. त्यांच्या स्वभावात मला सर्वात आवडलेला व दिसून आलेले गुण म्हणजे स्वाभिमान, जिद्द, मेहनत आणि अभ्यासू पत्रकार हीच संपादक जालिंदर धांडे सरांची ओळख होय असे मला वाटते. संघर्षातून उभे राहण्याची जिद्द हा जालिंदर धांडे सरांचा पत्रकारितेतील प्रवास संघर्ष आणि चिकाटीने भरलेला आहे. यातूनच त्यांनी स्वाभिमानी, जिद्दी मेहनती आणि अभ्यासपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर चार वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त सायं दैनिक प्रारंभ चा.... प्रारंभ केला. पत्रकारितेच्या प्रवासात अनेक अडचणी आल्या. परंतु ते डगमगले नाहीत कारण अडचणींना घाबरणार तर ते धांडे कसे. उलट आलेल्या अडचणी आणि समस्या यामध्येच त्यांनी संधी शोधली व त्या संधीचं सोनं केले. आज या सगळ्यांवर त्यांनी जिद्दीने मात केली. निर्भीड पत्रकारिता करण्याचा त्यांचा निश्चय कधीच ढळला नाही आणि त्यांनी आपला स्वाभिमानी बाणा कधीच सोडला नाही.

'सायं दैनिक प्रारंभ'ची स्थापना ही स्वाभिमानी, जिद्दी, मेहनती आणि अभ्यासू वृत्ती पत्रकारितेच्या क्षेत्रात भरीव योगदान देण्याच्या हेतूने जालिंदर धांडे यांनी स्वतःचे वृत्तपत्र सुरू करण्याचा



निर्णय घेतला. अशाप्रकारे 'सायं दैनिक प्रारंभ' या संध्याकाळी प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्राचा जन्म झाला. या वृत्तपत्राची खासियत म्हणजे सत्यशोधन, निर्भीड आणि अभ्यासपूर्ण पत्रकारिता. इतर संध्याकाळी प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांप्रमाणे केवळ सनसनाटी बातम्या देण्यापेक्षा 'सायं दैनिक प्रारंभ' ने कायम लोकशाहीला बळकट करणाऱ्या आणि समाजहिताच्या मुद्यांवर प्रकाश टाकणाऱ्या बातम्या देण्यावर आजवर भर दिला आहे. जालिंदर धांडे केवळ एक संपादक नाहीत, तर ते एका स्वाभिमानी, जिद्दी, मेहनती आणि अभ्यासू वृत्तीचे आदर्श उदाहरण आहेत. त्यांचा प्रत्येक लेख, संपादकीय आणि विश्लेषण हे सखोल संशोधनावर आधारलेले असते. त्यांनी समाजातील अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर सखोल अभ्यास करून सत्य लोकांसमोर आणले. त्याबरोबरच त्यांनी शोध पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक घटना या समाजासमोर आणून त्या अभ्यासपूर्ण मांडलेल्या अनेक बातम्या मधून दिसून आलेले आहे. तसेच शोध पत्रकारितेतून समोर आलेल्या बातम्यांची दखल अनेक वेळा शासन आणि प्रशासनाने घेतलेली आहे. कुठलीही बातमी प्रसिद्ध करण्याआधी त्या विषयाचा संपूर्ण अभ्यास करण्यावर त्यांचा भर असतो. सामाजिक प्रश्नांवर भाष्य: भ्रष्टाचार, शेतकरी प्रश्न, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्यसेवा यांसारख्या विषयांवर त्यांनी महत्त्वपूर्ण लेखन केलेले आहे. सत्ताधाऱ्यांपासून समाजातील अडचणींवर थेट प्रहार करणारा संपादक म्हणून जालिंदर धांडे यांनी नेहमीच निर्भीड आणि सत्यशोधक पत्रकारितेचा अवलंब केला आहे. अनेक वेळा त्यांनी सत्ताधारी, प्रशासन आणि प्रभावशाली व्यक्तींवर परखड भाष्य केले आहे. एका संपादकाचे 'धांडे पर्व'.... जालिंदर धांडे हे केवळ एक पत्रकार किंवा संपादक नाहीत, तर ते समाजाला दिशा देणारे व्यक्तिमत्व आहेत. 'सायं दैनिक प्रारंभ'च्या माध्यमातून त्यांनी पत्रकारितेत नवा अध्याय लिहिला आहे. त्यांच्या जिद्दी, मेहनती आणि अभ्यासू वृत्तीने पत्रकारितेची खरी ताकद काय असते, हे समाजाला त्यांनी दाखवून दिले आहे. त्यांचा हा प्रवास नव्या पत्रकारांसाठी आणि समाजासाठी सतत प्रेरणादायी ठरत राहील. त्यांच्या विचारधारेचा प्रकाश पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही. आज सायं दैनिक प्रारंभचा चौथा वर्धापन दिन त्यानिमित्त हा शब्द प्रपंच. सायं दैनिक प्रारंभ च्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आणि पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!!!

**अमोल तांदळे, चौसाळा**
**९४२००३२४३३**

# बोर्डाची परीक्षा,जाच कुणाला?

## परीक्षा मुलांची आहे, आई-वडीलांची नाही; हे पालक विसरतात आणि घरात ताण वाढतो- डॉ.जगदीश टेकाळे

दहावीची बोर्डाची परीक्षा या आठवड्यात सुरु होणार.बारावीची सुरुच आहे. विविध प्रवेश परीक्षांचे वार्षिक परीक्षांचेही आता अगदी मोजके दिवस हातात राहिलेले असताना, अगदी शेवटी नेमकं काय करावं, हा यक्षप्रश्न मुलांनाही पडतो आणि त्यांच्या पालकांनाही छळतो. खरं सांगायचं तर परीक्षेचा अभ्यास ही सतत नियमाने करायची आहे तब्येत राहावी, म्हणून रोज व्यायाम करायला हवा अगदी तसंच!

एका दिवसात किंवा आठवड्यात तुम्ही मॅरेथॉन धावू शकत नाही किंवा कोणत्याही खेळाच्या स्पर्धेत भाग घेऊ शक नाही, तर त्यासाठी नियमितपणे बराच काळ प्रयत्न करायचे असतात. तसेच,तुमचाही अभ्यास वर्षभर नियमित झाला आहे, असे मसजून आता शेवटच्या काही दिवसांत मुलांना आणि त्यांच्या आई-वडिलांनाही उपयोगी पडणाऱ्या गोष्टी बघूयात...

परीक्षेपूर्वी मुलांना काय काय करता येईल?

सर्वात महत्वाचा भाग म्हणजे आपला परीक्षेकडे बघण्याचा निकोप दृष्टिकोन, परीक्षा माझ्या आयुष्यात आलेला अडथळा/समस्या किंवा परीक्षेतील मार्क म्हणजे उत्तम आयुष्याची हमी,या दोन्ही विचारसरणींमुळे अनावश्यक ताण निर्माण होतो. मग अभ्यास केलेला असूनही परीक्षेत ब्लॅक होणं, खूप घाबरणं, आजारी पडणं,अशी लक्षणं दिसू लागतात. परीक्षा म्हणजे आपल्याला किती समजलंय आणि कशाचा अभ्यास किंवा सराव अजून करायला हवाय, एवढंच आपल्याला सांगणारी घटना आहे. परीक्षेतील मार्कांचा आणि आयुष्यातील आनंदाचा/यशाचा कोणताही सरळ संबंध नसतो.परंतु आपल्या देशातील शिक्षणपध्दतीमध्ये मार्कांवर करिअरची बरीचशी दिशा अवलंबून असते, त्यामुळे परीक्षेकडे वास्तववादी दृष्टिकोनातून बघणे खूप गरजेचे आहे. परीक्षेकडे संपूर्ण दुर्लक्ष किंवा परीक्षेचे अवडंबर करणे या दोन्ही गोष्टी टाळायला हव्यात.



परीक्षेच्या काळात काय टाळावं?

आपल्या पूर्वी झालेल्या चुकांचा विचार करत बसणे, त्याचा अतिविचार करणे/भिती बाळगणे.

विषयाची अतिचिंता करणे, अँडमिशनचा,कट ऑफचा विचार करणे, वर्षभरात जो भाग अभ्यासला नाही, त्याचा अचानक अभ्यास करणे, इतरांशी खूप चर्चा करणे, मित्रमंडळींशी वायफळ गप्पा/गॉसिप करणे, ग्रुपस्टडी करु नये.,वैयक्तिक अभ्यास अधिक उपयोगी पेपर लिहिताना मार्कांचा अंदाज घ्यायची घाई अजिबात नको., प्रत्येकाचे बायोक्लॉक/जैविक घड्याळ निरनिराळे असते. आदर्श टाईमटेबलच्या मागे लागून स्वतःला न जमणाऱ्या गोष्टी करु नये. जागरण किंवा खूप लवकर न उठताही दिवसभरात योग्य नियोजनाने अभ्यास करावा.

काय काय तयारी करावी ?

आदल्या दिवशी सर्व महत्वाचे साहित्य, हॉलतिकिट वगैरे सामान बॅगेत भरुन ठेवणे, आयत्या वेळी शोधाशोध केल्याने ताण वाढतो. संपूर्ण प्रश्नपत्रिका नीट,सावकास वाचणे, घाईने/वरवर वाचन नको. सिली मिस्टेक टाळण्याचा हा मार्ग आहे.,फक्त स्वतःच्या पेपरमध्ये लक्ष द्यावे.पेपर पूर्ण झाल्यावर तपासून बघायचा कंटाळा नको.,दीर्घश्वसन,डोळे बंद करुन स्वतःला सकारात्मक सूचना देणे.

परीक्षा काळात काय करावं?

उत्तम,सकस,घरजे जेवन., पेपरच्या दिवशी सुध्दा केलेला माफक व्यायाम ८ तास रात्रभराची झोप, ताण निवारणासाठी केलेले थोड्या वेळाचे मनोरंजन, मानसिक शांती आणि एकाग्रतेसाठी ध्यान/योगनिद्रा/प्राणायाम (१० ते १५ मिनिटे रोज)

आई-वडीलांनी काय करावं? काय टाळावं?

* परीक्षा मुलांची आहे पालकांची नाही. त्यामुळे आई-वडीलांनी आपण अनावश्यक ताण घेतल्याने काहीच फायदा होत नाही.

* ऑफिसमधुन सूट्टी घेऊन दिवसभर घरात थांबुन मुलांमागे सतत अभ्यासाचा तकादा लावु नका.

* मुलांना त्यांचा आवडीचा छंद जोपासण्यासाठी प्रोत्साहन द्यावं.

* सतत अभ्यास करण मुलांना शक्यही नाही आणि गरजेचाही नाही. * सुट्टी लागली की अमूक करु,तमूक करु अशी सुट्टी काळातली आवाजवी आश्वासने टाळा.

* परीक्षा देणे, अभ्यास करणे, करिअरचा विचार करणे ही मुलांची जबाबदारी आहे. अतिसूचना करणे,अनावश्यक सपोर्ट दिल्याने मुलं पालकांवर खूप अवलंबून राहतात आणि त्यांची निर्णयक्षमता,तसेच आत्मविश्वास कमी होतो.

* मुलांबरोबर संवाद सुरु ठेवा. त्यांचे म्हणणं ऐकून घ्या. * त्यांच्यासोबत तुम्ही कायम आहात,यश/अपयश काहीही मिळाले, तरी तुमचा आधार त्यांना हे शब्दांतून,कृतीतुन जरु पोहचवा.

* परीक्षा आहे, म्हणून संपूर्ण घराल वेठीस धरु नका. अबोला ,टोमणे,अतीसूचना नकोत. भावनिक चढ-उतार होतील असे प्रसंग/विषय जरुर टाळा असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडेलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

पान १/४ वरून

### बाळनाथ विद्यालय चाकरवाडी

महसूल सहायक पदी निवड झालेला महेश पवार यांनी सुद्धा त्यांच्यावर पुढे जात असताना किती संकटाचा सामना करावा लागला हे सांगितले. विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन परीक्षा संबंधी माहिती दिली. त्यात ते म्हणाले दहावी हा एक महत्त्वाचा टप्पा असून कोणत्याही प्रकारचा ताण तणाव विद्यार्थ्यांनी ठेवू नये. सद्गुरूंच्या ध्यानाने परीक्षेची सुरुवात करावी. मनावर कोणत्याही प्रकारचे दडपण न ठेवता अभ्यास करा. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नववी च्या विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती कदम आणि कोमल खिंडकर यांनी केले आणि आभार श्रुती कदम यांनी मानले.

-----------

### डॉ. विकास महात्मे

भर राहणार आहे. प्रशासनात नैतिक नेतृत्व, जबाबदारी आणि जागतिक सहकार्य वाढवण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील. ही संस्था राजकारणातील नीतिशास्त्र, मानवी हक्क, पर्यावरण, न्याय्य विकास आणि जागतिक शांतता यासारख्या विषयांवर कार्य करते. या परिषदेमध्ये डॉ. महात्मे यांचा सहभाग भारताच्या नैतिक राजकारणाच्या भूमिका अधिक प्रभावीपणे जागतिक व्यासपीठावर पोहोचवणार आहे.ही संपूर्ण देशासाठी आणि धनगर समाजासाठीही अभिमानाची बाब असल्याचे जिल्हाध्यक्ष बाबुलाल ढोरमारे यांनी सांगितले.

--------

### अभिनव इंग्लिश स्कूलमध्ये

नरसाळे, तलवाडा पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मोहन राठोड, शाळेचे प्राचार्य कृष्णा गांडूळे सर उपस्थित होते. प्रमुख मान्यवरांचा शाळेच्या वतीने प्राचार्य कृष्णा गांडूळे यांनी यथोचित सत्कार केला. दरम्यान पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, शाळेच्या नावाप्रमाणेच 'अभिनव ' असे उपक्रम राबवणारी शाळा म्हणजे अभिनव इंग्लिश स्कूल असून शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने चिमुकल्यांना शिवरायांच्या जीवन चरित्रावर विविध उपक्रम राबवून त्यांना शिवविचार देण्याचे पवित्र काम या शाळेच्या वतीने होत असल्याचे सांगत त्यांनी शाळेच्या संचालक मंडळाचे कौतुक केले व येणाऱ्या काळात ही शाळा गेवराईच्या शैक्षणिक क्षेत्रात मोठा नावलौकिक मिळवेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान शिवजन्माचा इतिहास व पराक्रम हा ऐतिहासिक भाषा आणि पोषाखात साभिनय सादरीकरण इयत्ता तिसरी वर्गाने केले. आदर्श राजा 'शिवछत्रपती' ही विचार मालिका इयत्ता दुसरी च्या वर्गाने सादर केली.

मुले शाळेत येताना ते अगदी चिखलाच्या गोळ्याप्रमाणे असते त्याला योग्य आकार देण्याचे काम गुरूजन करत असतात असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे पोलिस उपनिरीक्षक मोहन राठोड यांनी केले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते सहशालेय उपक्रमात प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी अनय काकडे, प्रांजल काकडे, ओवी पवार, ज्ञानदा वादे, वैदेही नाटकर, सानवी पट्टे, राजवीर काकडे, आविष्कार सानप, अंश चितळे यांनी भाषणे सादर केली. इयत्ता चौथीच्या मुलींनी आले मराठे या गाण्यावर नृत्य सादर केले. नर्सरी आणि एल.के.जी च्या विद्यार्थ्यांनी एकच राजा या गाण्यावर नृत्य सादर केले. इयत्ता पहिली व एल.के.जी ने 'राजं आलं राजं आलं' या गाण्यावर नृत्य सादर केले. यु.के.जी वर्गाने दैवत छत्रपती या गाण्यावर नृत्य सादर केले. ओजस कुलकर्णी ने वैयक्तिक शिवगीत गायन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य कृष्णा गांडुळे सरांच्या मार्गदर्शनाने प्रदिप चव्हाण, अश्मा पठाण, प्रियंका काळे, प्रतिक्षा साळवे, वैभव निवारे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य कृष्णा गांडूळे यांनी सुत्रसंचालन अंकिता मोटे यांनी केले तर शेवटी शितल मोंढे यांनी उपस्थितीतांचे आभार मानले.

### आदर्श विद्यालयात

पान १/४ वरून

मोरे मॅडम,श्रीमती दौंड मॅडम,श्रीमती धांडे मॅडम,श्रीमती वाकडे मॅडम,श्रीमती राऊत मॅडम,महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले व प्रतिमेला मानाचा मुजरा करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.इयत्ता ६ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी भाषणातून शिवरायांच्या शूरवीरतेच्या गाथा मनोगतातून व्यक्त केल्या.कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीम.वाघमारे मॅडम यांनी केले.

### छत्रपती शिवाजी महाराज

मनःपूर्वक शुभेच्छा. दिल्या यावेळी समाजसेवक सातिराम आणा ढोले पाटील, व सातिराम आणा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड संस्थापक अशोक दादा ढोले पाटील, ढोले पाटील, सहकारी मित्र प्रकाश तावरे यांच्या सह बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे आयोजन करण्यात आले होते उपस्थित राहून सर्व भारतवासीयानां छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभेच्छा दिल्या

### गेवराईत शिवशाही महानाट्य

छत्रपती शिवाजी महाराजांचे विचारसामान्य माणसापर्यंत नेण्याचे काम विजयसिंह पंडित यांनी केले -- जिल्हाधिकारी अविनाश पाठक

आ. विजयसिंह पंडित यांनी शिवजन्मोत्सव सोहळा व महानाट्याचे सातत्याने यशस्वी आयोजन करुन शिवाजीमहाराजांचे विचार सामान्य माणसापर्यंत घेऊन जाण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. राजा कसा असावा याचा आदर्श पुढच्या पिढीला कळावा हाच उद्देश त्यांचा आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघात यामुळे उत्कृष्ट वातावरण तयार झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

नेत्रदीपक रंगमंचावर ऐतिहासिक प्रसंगांनी उपस्थित रसिक भारावले

पाच मजली किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती, शोभीवंत सिंहासन मेघडंबरी, जहाजाचा वापर करुन महाराजांच्या कोकण मोहिमेचा जिवंत देखावा, भव्य राज्याभिषेक सोहळा, शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध साहित्य यासह अधुनिक ध्वनी व प्रकाश योजना, घोडे, बैलगाडी, पालखी, नेत्रदिपक अतिषबाजी यांचा वापर करुन मराठा व पातशाही यांच्या तलवारींचा खणखणाट, तोफांचा गडगडाट, अग्नीबाणांचा वर्षाव असा घनघोर रणसंग्राम पाहून उपस्थित रसिक आणि शिवप्रेमी नागरिक भारावले

बाजारतळ येथे शिवरायांना अभिवादन

राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती व नगर परिषद, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी गेवराई शहरातील बाजार तळ येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज बाल उद्यानाचे लोकार्पण भवानी अर्बन बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या शुभहस्ते तर आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्याचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्ष संदिप मडके, सहकार्याध्यक्षप्पदी संतोष सुतार, उपाध्यक्षपदी अँड मनोज हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल

सचिवपदी राहुल मस्के, सहसचिवपदी शहादेव निकम, कोषाध्यक्षपदी पप्पू पठाण, सह कोषाध्यक्षपदी रणजित घुंबार्डे यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांच्यासह शिवप्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी

पान १/४ वरून

यांच्या पुढाकारातून शिवजयंतीनिमित्त बीडमध्ये १९ ते २८ फेब्रुवारी या काळात नाथ चषक बीड प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. सी.पी. ग्राउंड पालवन चौक येथे या स्पर्धेचे उद्घाटन शिवजयंतीचे औचित्य साधून करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास जिल्हाप्रमुख अनिल जगताप, स्वप्निल गलधर,योगेश नवले, संदीप आदमाने, रवी वाघमारे आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी खेळाडूंना कुठलीही अडचण आली किंवा कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास आपण नेहमीच तत्पर असू असा विश्वास त्यांनी खेळाडूंना दिला. या क्रिकेट स्पर्धेसाठी १२ संघांनी सहभाग नोंदवला आहे. विजेत्या संघासह सर्व खेळाडूंना शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या वतीने भरघोस बक्षीस दिले जाणार आहे. यावेळी बीड शहरासह तालुक्यातील खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अंजली दमानिया यांचे पुन्हा

ट्रायल करणे आणि आपल्या अर्धवट बुद्धीचे प्रदर्शन करणे असे आहे.

अंजली दमानिया यांनी गेल्या पंधरा वर्षात ज्या काही मीडिया ट्रायल रन केल्या, ज्या कोणाविरुद्ध आरोप केले त्यातील एकही आरोप अद्याप कोणत्याही मा न्यायालयात अथवा इतरत्र कोठेही सिद्ध होऊ शकलेला नाही. त्याचेही कारण अर्धवट माहिती हाच असावा.

मंत्रिमंडळाचा निर्णय झाला किंवा नाही असे भासवून निर्णय होत नाही, भासवून गोष्टी करण्यासाठी ती अंजली दमानिया यांची प्रेस कॉन्फरन्स आहे का, असा प्रश्नही धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलाय!

एखाद्या विषयास मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चेअंती मान्यता झाल्यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त हे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केल्यानंतर राज्यातील सर्वोच्च आयएएस अधिकारी असलेल्या माननीय मुख्य सचिव यांच्या स्वाक्षरीने निर्गमित केले जातात. मात्र दमानिया यांनी या प्रक्रियेची माहिती घेतली असती तर असे निराधार आणि धादांत खोटे विधान कदापि केले नसते.ऑफिस ऑफ प्रॉफिट पासून ते काहीही तथ्य नसलेल्या घोटाळ्यांचे कोणते तरी अर्धवट कागद समोर दाखवून त्याला पुरावा म्हणणे आणि मिडिया ट्रायल रन करणे हे अंजली दमानिया यांचा व्यवसाय झालेला आहे, त्यासंदर्भात त्यांच्याकडे काँक्रीट कागदपत्रे असल्यास त्यांनी न्यायालयात जावे, आता न्यायालयामध्ये आम्ही देखील त्यांना योग्य तो धडा शिकवू, असेही धनंजय मुंडे म्हणालेत.फर्टीलायझर कंट्रोल ऑर्डर हा केंद्र शासनाचा कायदा आहे, त्यानुसार विशिष्ट प्रमाणपत्र धारण केल्याशिवाय व खत निर्माता कंपनीने प्राधिकृत केल्याशिवाय कोणालाही खतांची विक्री करता येत नाही. यासंदर्भात ने संबंधित कंपन्यांना २०२२ व २०२३ मध्ये सुद्धा नोटीस दिलेल्या आहेत. पण आपल्या सोयीचे तेवढे बोलायचे आणि अर्धवट ज्ञान प्रदर्शन करणे हे धोरण फक्त बदनामीसाठी आहे.सदर कंपन्या या आमची उत्पादित खते विकण्यास प्राधिकृत नाहीत, फर्टीलायझर कंट्रोल ऑर्डर मधील तरतुदींप्रमाणे ओ प्रमाणपत्र असल्याशिवाय अशी खते विकता येत नाहीत, अशा प्रकारची प्रेस रिलीज आमचे स्वीय सहाय्यक यांनी नव्हे तर स्वतः इफकोने याआधीच काढलेली आहे, तसेच ती आजही चा संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अंजली दमानिया यांना देखील ही बाब समजत असावी, मात्र तरीही खोटे बोल पण रेटून बोल, असा उद्योग त्यांनी चालवला आहे.

### महादेव मुंडे प्रकरणाच्या

तपासाची चक्रे फिरली, ५० हून अधिक जणांची झाडाझडती

महादेव मुंडे खून प्रकरणाचा तपास पोलीस उपअधीक्षक अनिल चोरमले आणि विशेष पथकाकडून केला जातो आहे.परळी शहरात आतापर्यंत या प्रकरणात साक्षीदार आणि प्रत्यक्षदर्शी असे ५० हून अधिक जणांची चौकशी करण्यात आली. पोलीस उपअधीक्षकांच्या मदतीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी विशेष पथक नियुक्त केले आहे .पोलीस अधीक्षक नवनीत कावंत यांचे महादेव मुंडे हत्या प्रकरणाकडे विशेष लक्ष देण्यात येत असूनहे पथक परळीत तळ ठोकून असून पथकाकडून कमालीची गुप्तता बाळगली जात आहे. तसेच या प्रकरणातील आरोपी निष्पन्न करण्यासाठी विशेष पथकाकडून शोध घेतला जात आहे..१६ महिन्यांपूर्वी परळी शहरातील महादेव मुंडे यांचा खून झाला होता या प्रकरणात अद्याप एकाही आरोपीला अटक नाही. या प्रकरणाचा आता पुन्हा नव्याने तपास सुरू करण्यात आला आहे.

## आंबेगाव येथील शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

# शिवसृष्टीला प्रेरणा आणि अभ्यासाचे केंद्र म्हणून भेट द्यावी–मुख्यमंत्री

### शिवसृष्टीच्या पुढील टप्प्यासाठी ५० कोटी रुपये निधी देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

पुणे । प्रतिनिधी

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य, स्वधर्म व स्वभाषा या त्रिसुत्रीवर आधारित शिवसृष्टी येथे मांडण्यात आलेले दालन अत्यंत प्रेरणादायी असून महाराष्ट्रातील व देशातील प्रत्येक विद्यार्थ्यांनी या शिवसृष्टीला प्रेरणा आणि अभ्यासाचे केंद्र म्हणून भेट द्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण प्रसंगी केले. तसेच शिवसृष्टीच्या पुढील टप्प्याचं काम अधिक वेगाने व्हावे यासाठीही राज्य शासनाकडून आणखी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची घोषणा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केली.**

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, खासदार मेधा कुलकर्णी, उदयनराजे भोसले, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, विजय शिवतारे, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, नानासाहेब जाधव, रविंद्र वंजारवाडकर, शिवसृष्टीचे जगदीश कदम, विनय सहस्त्रबुद्धे, अमृत पुरंदरे आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे उत्तम लढवय्ये, उत्तम योद्धे तर होतेच त्याबरोबरच ते उत्तम प्रशासक होते. महिलांचा सन्मान आणि शेवटच्या घटकापर्यंत सर्वांना संरक्षण देण्याचे काम त्यांनी केले. नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. परंतु खऱ्या अर्थाने मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देण्याचे काम



शिवरायांनी केले. ज्यावेळी अरबी आणि फारसी या शब्दावलीतून राज्यकारभार चालायचा तेव्हा छत्रपती शिवरायांनी स्वभाषेचा आग्रह धरुन मराठीचा वापर चालू केला. त्याचे पर्यायी मराठी शब्द लिहायला लावले. त्या प्रकारची नवीन आज्ञावली शिवरायांनी तयार केली, असे सांगून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर दिल्ली येथे २१ फेब्रुवारी पासून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी शिवसृष्टी येथील स्वराज्य, स्वभाषा व स्वधर्म या त्रिसुत्रीवर आधारित दालन, गंगासागर व भवानी मातेच्या मंदीराला मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी रायगड किल्ल्यावरुन आणलेले जल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गंगासागर मध्ये अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाला विविध मान्यवर तसेच शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# जि.प.प्रा.रिधोरी शाळेत शिवजयंती साजरी


माजलगाव । प्रतिनिधी

जि.प.प्रा.शाळा रिधोरी, केंद्र टाकरवन, येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या कार्य कर्तृत्वावर भाषणे केली. तसेच मुलांनी व मुलींनी शिवाजी महाराज व जिजाऊंच्या गाण्यावर अप्रतिम नृत्य सादर केले. यावेळी मान्यवरांनी व सर्व ग्रामस्थांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाला सरपंच गोपाळराव तौर, मुख्याध्यापक नानस्कर सर तसेच शिक्षिका सुरेखा कांबळे, शालेय समितीचे अध्यक्ष सतीश तौर, सोमेश्वर तौर, हनुमान तौर, गौतम तौर, गोटूराम तौर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामस्थ आणि पालक उपस्थित होते.

# बीडच्या नाट्यगृहाची दुरावस्था

## शरद पोंक्षेनी नगरपरिषद प्रशासनाच्या अब्रुची लक्तरे वेशीवर टांगली







बीड। प्रतिनिधी

बीड शहराचे वैभव असलेल्या शहरातील एकमेव रंगमंच असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. दि.१६ रविवारी ''पुरूष'' नाटकांच्या सादरीकरणासाठी आलेल्या कलावंतांना झालेल्या गैरसोयीबद्दल बंद वातानुकूलित यंत्रणा, घाणेरडे स्वच्छतागृह, तुटलेले सोफे याबाबत ज्येष्ठ कलावंत शरद पोंक्षे यांनी असुविधांबाबत जाहीर नाराजी बोलावून दाखवत पुन्हा बीडला या नाट्यगृहात नाट्य प्रयोग सादर करण्यासाठी येणार नसल्याचे जाहीर करत नगरपरीषद प्रशासनाच्या अब्रुची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. त्यामुळे संबंधित प्रकरणात आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.

बीड शहरातील इतर कामांवर कोट्यावधीचा खर्च करणाऱ्या नगरपालिका प्रशासनाला नाट्यगृहाची दुरावस्था दिसत नसल्याने कलाकारांचे हे माहेरघर मोडकळीस येते की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांना तक्रार केली आहे.

बीड जिल्ह्यातील सर्वात पहिले व सर्वात मोठे असा एकेकाळी नावलौकिक असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहातील खुर्च्यांची मोडतोड व वातानुकूलित यंत्रणेचा बिघाड, स्वच्छतागृहाची मोडतोड झाल्याने कलावंत नाट्यप्रेमींची कुचंबणा होत असल्याचा आरोप करत नाट्यप्रेमींनी बीड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या नाट्यगृहाच्या दुरूस्तीकडे प्रशासन जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याचा आरोप करत नाट्यगृह बचाव कृती समिती नाट्यप्रेमींनी पेटी , ढोलकीच्या तालावर गाणे म्हणत दि. १२ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन केले होते.

आंदोलनात नाटककार व कलावंत डॉ.सतिश साळुंखे, डॉ.सुधीर निकम, लक्ष्मीकांत दोडके,प्रतिक कांबळे, कैलास शिंदे,गौतम खटोड, मुकुंद धुताडमल, रविराज जेधे, डॉ.उज्वला वनवे, एजाज अली, विनोद दळवी, डॉ.वारे , सुरेश साळुंके, केशव भागवत,देवा दहे,बाळु निसर्गंध आदींनी सहभाग घेतला होता.

# छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याबरोबर सुराज्याची स्थापना केली – राजेभाऊ फड

परळी। प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याबरोबर सुराज्याची स्थापना केली. अठरापगड जाती – धर्माच्या प्रजेच्या हिताच्या रक्षणाची त्यांनी विशेष काळजी घेतली. आपल्या राज्यातील जनतेच्या मिरचीच्या देठालाही धक्का लागला नाही पाहिजे असा राजेंचा कटाक्ष होता. म्हणूनच त्यांना सबंध विश्वाचे ''जाणते राजे'' अशी पदवी बहाल केली. हेच सुशासन अबाधित राखणे, तोच सलोखा कायम ठेवणे या राज्याचे नागरिक म्हणून आपल्या प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केले. पक्षाच्या वतीने शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील संपर्क कार्यालयात शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच महाराजांच्या अश्वारूढ



पुतळयाला अभिवादन करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या नेतृत्वाखाली परळी वैजनाथ शहरात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य चौकातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील महाराजांच्या अश्वारूढ पुतळयास अभिवादन करण्यात आले. तसेच पक्षाच्या परळी विधानसभा जनसंपर्क कार्यालयात शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ज्येष्ठ नेते उत्तमदादा माने, शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख, मुक्ताराम गवळी, महिला आघाडीच्या जिल्हा सरचिटणीस मंगलताई सोळंके, तालुकाध्यक्ष वर्षाताई रायभोळे, शहराध्यक्ष कल्पनाताई देशमुख, शिवाजीराव लोमटे, भगवानराजे कदम, प्रकाश मुंडे, युवा कार्यकर्ते अक्षय सोनवणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी शिवचरित्रावर प्रकाश टाकला. ते बोलत असताना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास हा पुढील शेकडो पिढ्यांसाठी प्रेरणादायी आणि आदर्श असा आहे. महाराजांनी उभे केलेले स्वराज्य आणि सुराज्य आजच्या काळात अबाधित राखण्यासाठी सर्वाभिमुख प्रयत्न होणे गरजेचे असल्याचेही प्रतिपादन त्यांनी केले.

# सरस्वती विद्यामंदिरचे आदर्श माता पुरस्कार जाहीर

बीड। प्रतिनिधी

येथिल शिवाजीनगर भागातील सरस्वती विद्यामंदिर चे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच आपल्या पाल्यास सर्वगुणसंपन्न बनवून देशाचा एक आदर्श भावी नागरीक घडविणाऱ्या मातांचा सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड चे संस्थापक सचिव सन्माननीय उत्तमराव पवार साहेब यांच्या मातोश्री स्व.नानीबाई पवार यांच्या स्मरणार्थ दिले जाणारे सन –२०२५ चे माझी आई नानीबाई आदर्श माता पुरस्कार जाहीर झाले असून सदरील पुरस्कारांचे वितरण दिनांक २२/२/२०२५ शनिवार रोजी सकाळी ठीक १०:०० वा.सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड प्रशालेत मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहेत.

सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड या प्रशालेचे सन–२०२५ चे माझी आई नानीबाई आदर्श माता पुरस्कार या वर्षी सौ.कांता संतोष सोनवणे( पी.एस.आय.) चिडीमार पथक बीड ( विशेष पुरस्कार) , सौ.वैष्णवी निलेश मोहिते .स्नेहसावली अनाथ आश्रम रामनगर बीड ( विशेष पुरस्कार) , सौ.गंगाताई अर्जुनराव शिंदे ( अलंकार ड्रेसेस बीड, डॉक्टर जयश्री जनार्दन मुंडे, सौ.अनिता रविंद्र निर्मळ,सौ.सारिका सत्यप्रेम पैठणे, सौ.रेखा विश्वास घोसाळकर, सौ.मिना मिठ्ठू गुरव व सौ.मंगल पांडुरंग खराडे या आदर्श मातांना जाहीर झाले असून पुरस्कार जाहीर झालेल्या सर्व आदर्श मातांचे संस्थेचे संस्थापक सचिव मा.श्री.उत्तमराव पवार साहेब, संचालक मा.श्री.बाबुलाल पवार साहेब तसेच संस्थेच्या सर्व संचालक मंडळासह सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड चे सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी पालक व विद्यार्थ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. आदर्श माता पुरस्काराचे हे ९ वे वर्ष असुन ९ व्या वर्षाचे औचित्य साधत ९ आदर्श मातांना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत असे कार्यक्रमाचे आयोजकांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

# सीसीआय खरेदी बंद असल्याने कापसाच्या भावात क्विंटलमागे पाचशे रुपयांनी शेतकऱ्यांचे नुकसान

बीड । प्रतिनिधी

'सीसीआय'च्या स्वॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे कारण सांगून गेल्या आठवड्यापासून सर्वत्र 'सीसीआय'ची कापूस खरेदी बंद झाल्याने त्याचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसत असून क्विंटलमागे ५०० रुपये कमी दराने खालगी बाजारपेठेत कापूस विकावा लागत आहे असल्याचे कृषी उत्पन्न बाजार समिती बीड संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे. ही तांत्रिक बिघाड दुरुस्त कधी होणार याबाबत अद्याप 'सीसीआय'ने कोणताही खुलासा केलेला नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. आधीच सोयाबीन खरेदी ही अर्धवट शेतकऱ्यांची झालेली असताना त्यात भर असता सीसीआयने घालत शेतकऱ्यांवर अन्याय सुरू केला आहे.

कापसाची विक्री, चुकारे व अन्य आवश्यक तपशिलासंदर्भात सर्व माहिती याच स्वॉफ्टवेअरद्वारे केली जाते. मात्र गेल्या काही दिवसांपासून या स्वॉफ्टवेअरमध्ये बिघाड झाल्याचे सांगितले जात आहे. 'सीसीआय'च्या खरेदी केंद्रावर कापसाने भरलेली वाहने घेऊन आलेल्या शेतकऱ्यांना या तांत्रिक बिघाडाचा मोठा फटका बसला. केंद्र सरकारच्या भारतीय कापूस महामंडळाने (सीसीआय) यावर्षी महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस पणन महासंघाला उपअभिकर्ता म्हणून करार दिला नाही. त्यामुळे 'सीसीआय' सर्वत्र स्वत: कापूस खरेदी करत आहेत. गेल्या आठवड्यापासून मराठवाडा विदर्भासह सर्वत्र सुरू असलेली 'सीसीआय'ची कापूस खरेदी बंद आहे.

यावर्षीच्या खरीप हंगामासाठी केंद्राने ७५२१ रुपये असा कापसाला प्रति क्विंटल दर हमीभावानुसार निश्चित केला आहे. मराठवाड्यातील विशेषतः बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मात्र ७४२१ असा दर शेतकऱ्यांना मिळत होता. इतर भागापेक्षा कमी दर मिळण्याचे कारण हे आखूड धागा हे सांगितले जात होते. तथापि अचानक 'सीसीआय'ची खरेदी बंद झाल्याने कापसाचे दर किमान ५०० रुपयाने घसरले आहेत. खासगी बाजारात सध्या ६९०० रुपये दराने कापसाची खरेदी केली जात आहे. सर्वत्रच शेतकऱ्यांना त्यामुळे मोठा आर्थिक फटका सोसावा लागत आहे. कापसाचे दर वाढतील म्हणून शेतकरी गेल्या काही वर्षात हंगामाच्या शेवटच्या दिवसांपर्यंत कापूस साठवून ठेवतात. त्यामुळे अजूनही अनेक शेतकऱ्यांकडे कापूस शिल्लक आहे.

राज्यात एकूण ३ कोटी ६ लाख क्विंटल कापसाची खरेदी झाली असून यातली 'सीसीआय'ने १ कोटी ३८ लाख क्विंटल खरेदी केलेली आहे. यामध्ये बीड कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत ६२ हजार ६२९.४५ क्विंटल खरेदी करण्यात आलेली आहे. बाजारात 'सीसीआय'ची खरेदी चालू होती तेव्हा खासगी दरही व्यवस्थित होते, पण 'सीसीआय'ची खरेदी बंद झाल्याने आता सारी मदार खासगी खरेदीवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे खासगी खरेदीचे दर घसरले. दरम्यान स्वॉफ्टवेअरमध्ये असलेली ही तांत्रिक बिघाड दुरुस्त कधी होणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. ती लवकरात लवकर व्हावी असं संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे.

# विद्यार्थ्यांचे परिश्रम,जिद्द व शिक्षकांचे यशस्वी मार्गदर्शन यामुळेच संस्थेची यशस्वी परंपरा कायम- संकेत मोदी

## दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत मानव विकास मूकबधिर विद्यालयास सर्वसाधारण विजेतेपद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गेवराई येथे दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत संपूर्ण बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळा सहभागी झाल्या होत्या. या क्रीडा स्पर्धेत मूकबधिर प्रवर्गातुन अंबाजोगाई येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मानव विकास मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण विजेतेपद मिळवत आपल्या संस्थेच्या यशाचे सातत्य कायम ठेवले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व गुण गौरव संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांचे परिश्रम , जिद्द व त्याबरोबरच शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच संस्थेची यशस्वी परंपरा कायम राहिली असल्याचे मत व्यक्त केले.

स्पर्धेत सहभागी झालेल्या मूकबधिर विद्यार्थ्यांमध्ये स्वप्निल सूर्यवंशी, सुरज माने,ओम ठाकरे, संस्कार कांबळे, नंदिनी अग्रवाल, अंशिका हातागळे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. लांब उडी, दोनशे मीटर धावणे, गोळा फेक, ४०० मीटर धावणे अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन दिव्यांगांच्या या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत करण्यात आले होते. वयोगट निहाय गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक ओम ठाकरे याने तर संस्कार कांबळे याने लांब उडी स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला . त्याचबरोबर पूजा बळी, ओंकार सूर्यवंशी हर्षदा चाटे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. या संपूर्ण स्पर्धेत मूकबधिर विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाची दोन ,द्वितीय दोन तर तृतीय क्रमांकाची तीन पारितोषिके पटकावत जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद मिळवले. मानव विकास मतिमंद विद्यालयातील विद्यार्थी शेख इब्राहिम निजामुद्दीन याने मतिमंद प्रवर्गात लांब उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला तर मानव विकास अपंग विद्यालयातील विद्यार्थी गंगाधर जाधव व राहुल मस्के यांनी अस्थिव्यंग प्रवर्गात १०० मीटर धावणे व २५ मीटर कुबडीवर धावणे या क्रीडा प्रकारात द्वितीय



क्रमांक संपादन केला . जिल्हास्तरीय सांस्कृतिक महोत्सवात मानव विकास मूकबधिर विद्यालयाने हिना या चित्रपटातील ''देर ना हो जाए'' या गीतावर आपले उत्कृष्ट असे समूहनृत्य सादर करून प्रथम क्रमांक मिळवला.जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने शिक्षकांसाठी आयोजित केलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेत मानव विकास मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक आप्पासाहेब चव्हाण यांनी जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक संपादन केला.

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ हे आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक प्रवाहात आणून त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करत असते. विद्यार्थ्यांचे परिश्रम व जिद्द आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच क्रीडा स्पर्धेतील अजिंक्यपदाचे सातत्य व परंपरा कायम राहिली असल्याची भावना यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक करतांना श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर समाजातील उपेक्षीत घटकांना क्रीडा व सांस्कृतिक शिक्षण देऊन त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता येईल यासाठी येथील शिक्षक हे विशेष असे परिश्रम घेत असल्याचे संकेत मोदी यांनी सांगितले. विद्यालयातील विद्यार्थ्यांचे परिश्रम व जिद्द तसेच त्यांना वेळोवेळी मिळणारे शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात संस्थेच्या विद्यार्थ्यांचे यश मिळवण्याचे सातत्य टिकुन आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांमुळेच विद्यालयाचे नाव शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात आघाडीवर येऊन संस्थेचे नाव राज्यस्तरावर उज्वल होत असल्याचा अभिमान संकेत मोदी यांनी याप्रसंगी व्यक्त केला. यापुढेही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सदैव प्रयत्नशील राहिलअसे संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांनी आवर्जून नमूद केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक आनंद टाकळकर, विशेष शिक्षक व विभाग प्रमुख दिलीप साठे, डी. बी. शिंदे, श्रीमती वर्षाराणी भालकीकर पवार, बी. ए. नांदुरकर, आबेद पठाण, राजेंद्र वाघमारे, विजय कोंबडे, राजेंद्र कसबे यांनी मार्गदर्शन केले आहे.

जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्रा. डॉ. बी.आय. खडकभावी, अध्यक्ष भूषण मोदी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रीमती मेश्राम मॅडम, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता अंकुशराव नखाते, संस्थेचे मार्गदर्शक डॉ. डी. एच. थोरात, प्रा.वसंत चव्हाण, दिनकर जोशी, सुरेश मोदी, सी. व्ही.गायकवाड , फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश तरके , बी. एड. कॉलेजचे प्राचार्य डॉ, पुजदेकर , मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंद टाकळकर, मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक आप्पासाहेब चव्हाण, अपंग विद्यालयाचे मुख्याध्यापक इंद्रकुमार लोढा, मु.अ. विनायक मुंजे, सौ. अंजली जोशी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा – ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा – बीड पिन – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा – ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा – बीड पिन – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे




सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ

गुरुवार दि. २० फेब्रुवारी २०२५






# शिवछत्रपतींचा आदर्श भावी पिढीने चालवावा यासाठी ही पदयात्रा - जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवछत्रपतीं एक आदर्श राजे होते, कर्तव्यदक्ष प्रशासक होते. प्रसंगी कठोर न्यायाधीश होते.आदर्श व्यक्तिमत्व होते.जितके कठोर तितकेच प्रजेप्रती प्रेमळ आणि मायाळू असलेले राजे शिवछत्रपती आपणास लाभले हे आपले भाग्य आहे. त्यांच्या आदर्श विचारांचा वारसा आपण चालवत आहोत तो पुढे पुढच्या पिढीने समर्थपणे चालवावा यासाठीच आज महाराजांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त संविधानाची शपथ घेऊन आपण पदयात्रा काढत आहोत असे मत व्यक्त करून जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी शिवजयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या निमित्ताने आज साऱ्या बीड मध्ये जय छत्रपती शिवाजी महाराज-जय भारत चा निनाद झाला.

बीड येथील श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या शिवजयंती निमित्त भव्य पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेला हिरवा झेंडा दाखवून जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी प्रारंभ केला.यावेळी उपजिल्हाधिकारी शैलेंद्र सूर्यवंशी, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा क्रीडा



अधिकारी अरविंद विद्यागर, नेहरू युवा केंद्राचे प्रमोद जव्हेरी, स्काऊट गाईडचे योगेश आवडाळ, उपशिक्षणाधिकारी काकडे, हजारे, विस्तार अधिकारी रघुनाथ राऊत भगवानराव सोनवणे सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये बीड शहरातून भव्य दिव्य जनजागृती प्रित्यर्थ पदयात्रा काढण्यात आली. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक म्हणाले, रयतेप्रति आपुलकी असलेला राजा आपल्याला लाभला आणि राजावर प्रेम कसं करावं तो आदर्श या मातीतील प्रजेने सिद्ध केलं. त्यांनी सर्व जाती धर्मांना समान वागणूक देत खऱ्या अर्थाने जनतेचे आदर्शवत राज्य निर्माण केले. तोच आदर्श आज आपली पिढी समर्थपणे चालवत आहे. पुढच्या पिढीने हाच वारसा पुढे समर्थपणे चालवावा यासाठीच राजे शिवछत्रपतींची ३९५ जयंती आपण मोठ्या उत्साहाने साजरी करत आहोत. जयंतीनिमित्त आज संविधानाची शपथ घेऊन आपण भव्य पदयात्रा काढत आहोत. सर्वांनी छत्रपतींचा आदर्श कायम आपल्या जीवनात अंगीकारावा आणि सामाजिक सलोखा जपावा असे आवाहन बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना केले. या पदयात्रेचा समारोप छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सकाळी १०:३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. या पदयात्रेमध्ये बीड शहरातील विविध शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी, शासनाच्या विविध विभागातील कर्मचारी,अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, वकील, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंदवी स्वराज्य संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त आमचे मार्गदर्शक श्री बाजीराव दादा चव्हाण यांच्या संकल्पनेतून शिवप्रेमींना अल्प उपहार खिचडी वाटपाचे आयोजन करण्यात आले यावेळे आयोजक ❊शेखर पवार मित्र परिवार**



## आदर्श विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

आज विद्यालयात अवघ्या हिंदुस्थानाचे आराध्य दैवत श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्रीम.डोके मॅडम व श्रीम.औटी मॅडम उपस्थित होत्या, श्रीमती आवळे मॅडम,श्रीमती ▶▶ पान २ वर...

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त जिल्ह्यातील विविध ठिकाणी रक्तदान, अन्नदान आदी कार्यक्रमांत उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली काल दि १९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज हे प्रेरणास्थानच असं आहे की, कोणत्याही परिस्थितीत मन खचत नाही !



महाराष्ट्रातील अठरापगड जातीतील मावळ्यांना संघटीत करत रयतेचं 'स्वराज्य' निर्माण करणारे आणि लोककल्याणकारी राज्याचा आदर्श प्रस्थापित करणारे आदर्श शासनकर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांना जयंतीनिमित्त कृतज्ञतापूर्वक अभिवादन ! करून सर्वांना शिवजयंतीच्या ▶▶ पान २ वर...

# धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्वराज्य सप्ताहाचे दिमाखदार उद्घाटन

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळीत धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आज शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पुढील सात दिवस आयोजित करण्यात येत असलेल्या स्वराज्य सप्ताहाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर आबा चव्हाण, युवकनेते अजय मुंडे यांसह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.







## ॲड.राजेश्वर आबा चव्हाण, युवक नेते अजय मुंडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

तत्पूर्वी मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन सामूहिक अभिवादन करण्यात आले. यावेळी शिव घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. धनंजय मुंडे यांनी स्वतः त्यांच्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून परळी शहरातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारलेला आहे. याठिकाणी नाथ प्रतिष्ठान च्या वतीने शिवकालीन प्रवेशद्वार, विद्युत रोषणाई, तसेच खास सेल्फी पॉईंट उभारण्यात आले आहेत. याठिकाणी शिवप्रेमी नागरिकांनी प्रचंड गर्दी केलेली पाहायला मिळाली. दरम्यान पुढील सात दिवसात स्वराज्य सप्ताह या उपक्रमात विविध सामाजिक उपक्रम राबविले जाणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व नागरिकांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके तसेच शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले आहे.

## मूकनायक व दर्पण दिनानिमीत्त पुरस्कार वितरण सोहळा



गेवराई । प्रतिनिधी

मूकनायक व दर्पण दिनानिमित्त गेवराई येथे महाराष्ट्र पत्रकार संघ यांच्या वतीने मूकनायक व दर्पण दिनानिमीत्त विविध पुरस्कारचे आयोजन करण्यात आले आहे उल्लेखनिय कार्य करणाऱ्यास या विविध पुरस्कारने मान्यवरांच्या हस्ते सन्मानीत करण्यात येणार आहे या वर्षीचे पुरस्कार प्राप्त मान्यवरामध्ये साप्ताहिक प्रकाश आधार चे संपादक सुनील पोपळे यांना मूकनायक, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ(मुंबई)चे गेवराई तालुका अध्यक्ष अंकुश आतकरे यांना दर्पण पुरस्कार,कोल्हेर ग्रामपंचायत सरपंच रामप्रसाद चाळक यांना आदर्श सरपंच पुरस्कार, सिरसमार्ग ग्रामपंचायत सरपंच सुरेश मार्कंड यांना आदर्श सरपंच पुरस्कार,चिखली वडगांव येथील रहीवाशी साईनाथ सुरवशे यांना उद्योगरत्न पुरस्कार,बंगाली पिंपळा येथील रहीवाशी राजु तात्या जाहागीरदार यांना उद्योगरत्न पुरस्कार,सिरसदेवी येथील डॉक्टर मारोती गरड यांना आरोग्य सेवा पुरस्कार, उमापुर येथील डॉक्टर काळे बळीराम यांना आरोग्य सेवा पुरस्कार,धारवंटा येथील शेतकरी सतीश शेळके यांना कृषिरत्न पुरस्कार,पाडळसिंग येथील रहिवासी भिष्मा घोडके यांना आदर्श शिक्षक पुरस्कार,काठोडा येथील शिक्षक शिंदे भारत यांना आदर्श शिक्षक पुरस्कार,पाचेगांव येथील शिक्षक तुकाराम पवार यांना आदर्श शिक्षक पुरस्कार,राहेरी येथील रहीवाशी जानकी ग्यानोबा फलके यांना आदर्श माता-पिता पुरस्कार,तर गेवराई शहरात आपले शैक्षणीक क्षेत्रात नावलोकिक करणारे शारदा कोंचीग क्लासेसचे अध्यक्ष शिवाजी वराट सर याना शिक्षण

क्षेत्रातील गेवराई भुषण पुरस्कार देउन गोरविण्यात येणार आहे अशा विविध क्षेत्रातील मान्यरांना विविध पुरस्कारने गेवराई येथे सिंधीभवन कार्यालयात दिंनाक २४ फेब्रुवारी वार सोमवारी रोजी सकाळी आकरा वाजता हा पुरस्कार सोहळा पार पड्णार आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष संत साहित्याचे अभ्यासक श्री मुरहरी केळे मुंबई, तर उदघाटक दैनिक झुंजार सेनापतीचे मुख्य संपादक श्री सोमनाथ पाटील मुंबई यांच्या सह अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थित हा सोहळा पार पड्णार आहे व मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार प्राप्त मान्यवराना सन्मानीत करण्यात येणार आहे तरी मोठया संख्यानी या पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा संपादक हुंबरे बापुसाहेब व जिल्हा सचिव चक्रधर घोडके यांनी केले आहे.

## डॉ. विकास महात्मे बेल्जियममध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार ही धनगर समाजासाठी आनंदाची बाब

बीड । प्रतिनिधी

माजी राज्यसभा सदस्य आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित डॉ. विकास महात्मे हे बेल्जियममध्ये २१ ते २२ फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या 'ग्लोबल कौन्सिल फॉर पॉलिटिकल रिन्यूअल' या आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत.



या परिषदेत कार्यकारी परिषदेचे अध्यक्ष म्हणून नैतिक राजकारण, पारदर्शकता आणि मानवकेंद्रित प्रशासन यावर ते आपले विचार मांडतील. 'वसुधैव कुटुंबकम्' या भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित नवी राजकीय प्रणाली विकसित करण्यावर त्यांचा ▶▶ पान २ वर...



**चौसाळा : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करताना छत्रपती संभाजीनगर येथील अन्वी धनंजय कागदे ही चिमुकली**

## बाळनाथ विद्यालय चाकरवाडी शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

बीड प्रतिनिधी - बीड तालुक्यातील श्री क्षेत्र चाकरवाडी येथील बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेतील १०वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. यावेळी या कार्यक्रमासाठी डॉ. ज्योतीताई मेटे, प्रा. फाटक सर, महसुल सहाय्यक महेश पवार, पत्रकार अभिजीत पवार, महसुल सहाय्यक आकाश चौधरी, मस्के तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले या मधे श्वेता खराडे, स्वरूपा जगताप यांनी मागील सहा



वर्षांमधील आठवणीना उजाळा दिला. निरोप समारंभाच्या वेळी सर्व मुले भावूक झाली होती. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्योतीताई मेटे म्हणाल्या की विद्यार्थ्यांना ज्या कार्यक्रमातून प्रोत्साहन भेटते ते कार्यक्रम आयोजित करावेत. दहावी च्या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे. विद्यार्थांनी अपयश जरी आले तरी निराश न होता जोमाने अभ्यास करावा, यश आपलेच आहे. तसेच शाळेचा माजी विद्यार्थी ▶▶ पान २ वर...

## अभिनव इंग्लिश स्कूलमध्ये ज्ञानदाना बरोबर चिमुकल्यांवर शिवविचार रुजविण्याचे कौतुकास्पद काम -पत्रकार जाधव



**गेवराई । प्रतिनिधी**

शैक्षणिक ज्ञानदानाबरोबर बाल वयातच विद्यार्थ्यांना छत्रपती शिवरायांचे विचार देऊन त्यांच्या मनावर शिव विचारांची प्रेरणा रुजविण्याचे काम अभिनव इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून होत आहे ही कौतुकास्पद बाब आसल्याचे प्रतिपादन सायं.दै.रिपोर्टरचे तालुका प्रतिनिधी पत्रकार भागवत जाधव यांनी केले.

गेवराई शहरातील कोल्हेर रोड वरील अभिनव इंग्लिश स्कुलमध्ये मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी अखंड विश्वाचे प्रेरणास्रोत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सायं.दै.रिपोर्टरचे तालुका प्रतिनिधी पत्रकार भागवत जाधव, पत्रकार विनोदजी ▶▶ पान २ वर...

## आजच्या पिढीने आपल्या आई-वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे-देवरे

अहिल्यानगर । प्रतिनिधी

प्रत्येक समाजाच्या धर्माचा सर्वांनी आदर केला पाहिजे, त्यामुळे समाजामध्ये एकता बंधुता व प्रेम निर्माण होईल. आजच्या पिढीने आपल्या आई-वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केले पाहिजे. असे आवाहन व्याख्याते भूषण देवरे यांनी केले.त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेवासा जि अहिल्यानगर (अहमदनगर )

यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शिव व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे सचिव यांच्यातर्फे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.देवरे म्हणाले कि आजच्या पिढीने छत्रपतींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून



आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण केले पाहिजे सर्वधर्मसमभाव ही भावना जोपासली पाहिजे. कारण छत्रपती हे फक्त एका धर्माचे राजे नव्हते ते रयतेचे राजे होते. भूषण देवरे यांनी येत्या काही दिवसात एक युवकांनी युवकांकडून युवकांसाठी चालवलेली चळवळ सुरू करण्याचे करण्याचे ऐलान देखील याच मंचावर केले.

## संस्कार विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

संस्कार विद्यालयात दिनांक १९ /२ /२०२५ रोजी शिवजयंती थाटामाटात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राथमिक विभागाच्या प्रमुख श्रीमती जाधव ताई व संस्कार इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक श्री परजणे सर होते.आणि प्रमुख पाहुणे म्हणून मिसेस गव्हाणे मॅडम यांनी स्थान भूषविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सुरज पाठक सर यांनी केले.

अध्यक्ष आणि मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.अध्यक्षांचे आणि मान्यवरांचे शब्द सुमनांनी



आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्या मिसेस गव्हाणे मॅडम यांनी त्यांच्या भाषणामध्ये शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्राविषयी माहिती सांगितली. शिवाजी महाराज व अफजल खान यांच्या भेटीवर आधारित असलेला पोवाडा त्यांनी अतिशय गोड आवाजात म्हंटला . कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गायकवाड मॅडम यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख प्रीती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी पार पाडला.